स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 24–07–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 12. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 13. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 14. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 15. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 16. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 126:— म.न.पा. मधील कार्यरत कंत्राटी पध्दतीवरील 7 वैद्यकिय अधिकारी यांना महानगरपालिकेत अन्य वैद्यकिय अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या मानधनाचा आधारावर दरमहा रू. 9300+ग्रेड पे 5400+वेळोवेळी देय असलेला महागाई भत्ता प्रमाणे वेतन लागु करण्यास मंजुरी करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या सुचने प्रमाणे, विभागाने सुधारीत प्रस्ताव सहीत 15 दिवसाचे आंत परत हा विषय स्थायी समितीसमोर सादर करावा या सुचनेसहीत विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 127:— केंद्रिय कार्यालय स्थित प्रशासकीय इमारती मधील पहिला व दुसऱ्या माळयावरील अंतर्गत सजावटीचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस.एस.पाटील ॲन्ड कंपनी यांची प्राकलनीय दरापेक्षा 11.10 टक्के कमी दराची रू. 1,08,36,501/— रकमेची निविदा स्विकृत करण्यासह व सन 2015—16 या आर्थिक वर्षात पद क्र. A42901371340 अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 128</u>:— गांधीसागर तलाव विकास प्रकल्प योजना तयार करण्याकरिता कन्सलटंट नियुक्तीबाबत.

नागपूर शहराच्या मध्यक्षेत्रात असलेल्या गांधीसागर तलावाचे अहमदाबाद येथील काकरीया तलावाचे धर्तीवर विकास करण्याचे प्रस्तावित आहे. शहरातील लोकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरावे, तलावातील पाण्याची शुध्दता सौदर्यीकरण, बोटींग, उपहारगृ्ह इत्यादीसह अन्य सुविधा पुरवून विकास करण्याचे नियोजन करण्याचे उदिष्ट ठेवून प्रकल्प योजना निर्गमित करण्याकरिता कंसलटंट नियुक्तीचा प्रस्ताव आहे. यात पुढील बाबीचा समावेश आहे.

1) तलाव व आजूबाजूचया क्षेत्राचे मौका निरिक्षण करणे व Google Map द्वारे Base Map तयार करणे.

2) Intel, Outlet, Highest water level इत्यादीची तसेच 100 मी अंतरावरील सार्वजनिक सुविधा व ऐतिहासिक इमारतीची माहिती मिळविणे व नकाशे तयार करणे.

3) लगतच्या मोकळया जागेचे सर्वेक्षण करून तलाव सौदर्यीकरणासह म.न.पा.स उत्पन्न मिळवून देणा–या योजना आखणे.

(4) विविध समस्या जाणून प्रारूप concept Master Plan तयार करणे त्यावर मनपाच्या विविध विभागाचे अभिमत जाणून घेणे व प्रकल्प योजनेत सामावून घेणे.

(5) विविध टप्प्यात करावयाच्या विकासाचे नियोजन करून प्रत्येक टप्प्याचे आराखडे, प्रकल्प अहवाल व व्यवहार्यता अहवाल इत्यादीसह अंतीम concept Master Plan तयार करून presentation सादर करणे.

उपरोक्त प्रकल्प योजनेचे प्रारूप व्यवहार्यता अहवाल तयार करण्याकरिता M/s HCP Design, Planning & Management Pvt. Ltd. यांनी रू. 15.00 लक्ष अधीक सेवाकर अशी फी पुढीलप्रमाणे विविध 4 टप्प्यात देण्याची मागणी केलेली आहे.

| Sr. No | Stage of Work | Payment |
|---|---|---|
| 1 | On receiving LOI Pre Feasibility and Concept Master Plan | Rs. 1,50,000/- |
| 2 | On submission of Area Assessment Report | Rs. 3,50,000/- |
| 3 | On submission/presentation of Draft Concept Master Plan | Rs. 5,00,000/- |
| 4 | On submission / presentation of Final Concept Master Plan | Rs. 5,00,000/- |

सदर योजनेचा मास्टर प्लॅन तयार करण्याकरिता पूढीलप्रमाणे कालावधी लागेल.

| Sr. No. | Deliverable | Time limit |
|---|---|---|
| 1 | Area Assessment Report | 1.5 Weeks |
| 2 | Draft Concept Master Plan | 2.5 Weeks |
| 3 | Final Concept Master Plan | 2 Weeks |

**प्रस्ताव :—**

गांधीसागर तलाव विकास योजनेचे प्रारूप व्यवहार्यता अहवाल मास्टर प्लॅनसह तयार करण्याकरिता M/s HCP Design, Planning & Management Pvt. Ltd. यांची नियुक्ती करणे आणि त्याकरिता Professional fees म्हणुन रू. 15.00 लक्ष अधिक शासकीय नियमानुसार 14% सेवाकर म्हणजेच 2,10,000/— असे एकुण 17.10 लक्ष खर्चास मंजुरी तसेच योजना तयार करताना विविध तज्ञांकरिता लागणारा प्रवासखर्च व निवास व्यवस्थेवरील रू. 4,41,600/— प्रस्तावित खर्चापैकी प्रत्यक्ष झालेला खर्च Reimburse करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 129</u>:— नाग नदी विकास प्रकल्प प्रारूप योजना तयार करण्याकरिता कंसलटंट नियुक्तीबाबत.

नागपूर शहराच्या मध्यभागातुन वाहणा–या नाग नदीची लांबी सुमारे 18 कि. मी. आहे या नदीमध्ये काही ठिकाणी नाला, पावसाळी नाली, जोडलेल्या असून काही

ठिकाणी सिव्हर लाईन सुध्दा आहे. शिवाय नदीच्या लगत झोपडपट्टया व काही बांधकाम आहेत काही भागात मोकळया जागा सुध्दा आहेत. शहराच्या मध्यभागातून नदीमध्ये काही ठिकाणी कचरा टाकला जातो. सिव्हर मुळे पाणी दुषित आहे. नदीचे सौंदर्य दिसून येत नाही. सुरत, अहमदाबाद सारख्या शहरातून वाहणा—या नदयांचा चांगला विकास झालेला आहे. त्याचप्रमाणे नदीचे शुध्दीकरण, लगतच्या भागातील अतिक्रमण, स्लम पुर्नवसन, रस्ते व पूलांचा विकास करून मोकळया जागा उपयोगात आणण्याचे दृष्टीने मास्टर प्लॅन (Master Plan) तयार करून मोकळया जागा टप्प्याटप्प्याने विकास करण्याचे नियोजन करण्याचे उद्दीष्टे ठेवून प्रकल्प योजना निर्गमित करण्याकरिता कंसलटंट नियुक्तीचा प्रस्ताव आहे. यात पूढील बाबींचा समावेश असेल ...

(1) जवळपास 18 कि.मी. लांबीच्या नाग नदीचा सर्वे करून अहवाल तयार करणे यात नदीची स्थिती, त्यावरील पूल, रस्ते, नदीला मिळणारे नाले, पावसाळी नाल्या, सिव्हर लाईन इत्यादीचे सर्वेक्षण करणे.

(2) नदीच्या 100 मी. अंतरावरील मोकळया जागा व त्यांची मालकी महत्वाच्या सार्वजनिक सुविधा, ऐतिहासिक इमारती इत्यादीचे सर्वेक्षण करून नकाशे तयार करणे.

(3) लगतच्या झोपडपट्टया व त्यांचे पूर्नवसन, खुल्या जागेच्या वापरासाठीच्या योजना, रस्त्याचे नेटवर्क, पूलाची आवश्यकता व topographical information मिळवून विकासाचे नियोजन करणे.

(4) विविध समस्या जाणून प्रारूप concept Master Plan तयार करणे त्यावर मनपाच्या विविध विभागाचे अभिमत जाणून घेणे व प्रकल्प योजनेत सामावून घेणे.

(5) विविध टप्प्यात करावयाच्या विकासाचे नियोजन करून प्रत्येक टप्प्याचे आराखडे, प्रकल्प अहवाल व व्यवहार्यता अहवाल इत्यादीसह अंतीम concept Master Plan तयार करून presentation सादर करणे.

उपरोक्त प्रकल्प योजनेचे प्रारूप व्यवहार्यता अहवाल तयार करण्याकरिता M/s HCP Design, Planning & Management Pvt. Ltd. यांनी रू. 18.00 लक्ष अधीक सेवाकर अशी फी पुढीलप्रमाणे विविध 4 टप्प्यात देण्याची मागणी केलेली आहे.

| Sr. No | Stage of Work | Payment |
|---|---|---|
| 1 | On receiving LOI Pre Feasibility and Concept Master Plan | Rs. 2,00,000/- |
| 2 | On submission of Area Assessment Report | Rs. 4,00,000/- |
| 3 | On submission/presentation of Draft Concept Master Plan | Rs. 6,00,000/- |
| 4 | On submission / presentation of Final Concept Master Plan | Rs. 6,00,000/- |

सदर योजनेचा मास्टर प्लॅन तयार करण्याकरिता पूढीलप्रमाणे कालावधी लागेल.

| Sr. No. | Deliverable | Time limit |
|---|---|---|
| 1 | Area Assessment Report | 1.5 Weeks |
| 2 | Draft Concept Master Plan | 2.5 Weeks |
| 3 | Final Concept Master Plan | 2 Weeks |

**प्रस्ताव :—**

नाग नदी विकास योजनेचे प्रारूप व्यवहार्यता अहवाल मास्टर प्लॉनसह तयार करण्याकरिता M/s HCP Design, Planning & Management Pvt. Ltd. यांची नियुक्ती करणे आणि त्याकरिता Professional fees म्हणुन रू. 18.00 लक्ष अधिक शासकीय नियमानुसार 14% सेवाकर म्हणजेच 2,52,000/— असे एकुण 20.52 लक्ष खर्चास मंजुरी तसेच योजना तयार करताना विविध तज्ञांकरिता लागणारा प्रवासखर्च व निवास व्यवस्थेवरील रू. 4,41,600/— प्रस्तावित खर्चापैकी प्रत्यक्ष झालेला खर्च Reimburse करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 130</u>:— स्थानिक संस्था कर विभाग कार्यादेश क्रमांक NMC/LBT/17/W.O दिनांक 05.09.2014 अन्वये सन 2013 — 14 या वित्तीय वर्षात दाखल करण्यात आलेले LBT Return चे कर निर्धारण व परीक्षण करण्याचे कामात स्थानिक संस्था कर विभागास सहाय्यता करणेचे काम प्रती प्रकरण रूपये 550/— प्रमाणे एकूण 4500 प्रकरणांकरीता मे. ए.एस. कुलकर्णी ॲन्ड असोसिएट्स, नागपूर यांना देण्यात आले आहे. आर्थिक वर्ष 2013—14 चे प्राप्त झालेले 22000 विवरणपत्र तसेच आर्थिक वर्ष 2014—15 करीता त्यापेक्षाहून जास्त प्रापत होणारे विवरणपत्र असे एकूण 45 ते 50 हजार प्राप्त विवरणपत्रांपैकी कमीत कमी 50 टक्के विवरणपत्राचे म्हणजेच जवळपास 20000 प्रकरणांचे निर्धारण करणे आवश्यक आहे. त्यामुळे म.न.पा.च्या उत्पन्नात निश्चितच वाढ होईल. करीता मे. ए.एस. कुलकर्णी ॲन्ड असोसिएट्स यांना आर्थीक वर्ष 2013—14 अंतर्गत देण्यात आलेले 4500 प्रकरणांचे निर्धारण करण्याचे काम प्रति प्रकरण रू. 550/— याप्रमाणे जून्याच दरावर 4500 प्रकरणांव्यतीरीक्त जवळपास 15500 प्रकरणांचे काम करण्यास मे. ए.एस.कुलकर्णी ॲन्ड असोसिएट्स तयार असल्याबाबतचे संमतीपत्र त्यांनी दिले असल्यामुळे तसेच या कामाकरीता दिनांक 18.09.2014 च्या करारनाम्यातील अट क्रमांक 10 "In case ASK do not intend such extension in the contract. It will be binding on ASK to continue the work on the same rate and same terms till NMC makes any alternate arrangement. NMC will compensate Party No. 2 ASK for the work carried by them in that period") लक्षात घेता मे. ए.एस.कुलकर्णी ॲन्ड असोसिएट्स यांना आर्थिक वर्ष 2013—14 व 2014—15 अंतगत एकुण 20000 LBT Return चे कर निर्णारण व परीक्षण करण्याचे कामा प्रती प्रकरण रूपये 550/— प्रमाणे देण्याच्या कामास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेण्याचा तसेच,

या कामाकरीता चार वर्षाचा खर्च रूपये 1 कोटी 10 लक्ष त्यानुसार प्रत्येक आर्थीक वर्षात रूपये 27 लाख 50 हजार खर्च अपेक्षीत आहे. हा खर्च पद क्रमांक A29100522807 मधून करण्यात येईल उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. च्या आर्थिक उत्पन्नात जलद गतीने वाढ व्हावी या उद्देशाने विभागाद्वारे कार्यादेश निर्गमित केलेल्या दिनांका पासुन प्रस्तावित काम दोन वर्षात एजन्सीने पुर्ण करावे. त्या प्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्षात रु. 55 लक्षच्या भुगतान करण्याच्या सुचनेसह एकुण 1 कोटी 10 लक्ष विभागाने प्रस्तावित केलेल्या राशीस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 131</u>:— नागपूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना (पेंच टप्पा —4) अंतर्गत उर्वरीत चार जलकुंभ 1. बाबुलवन 2. नालंदानगर 3. श्रीनगर 4. गोरेवाडा बांधण्याचे कामाकरीता स्थायी समिती द्वारे ठराव क्र. 64 दिनांक 14.07.2014 नुसार रू. 7.36 कोटटी च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. वरील कामांकरीता रीतसर निविदा मागविण्यात आली असता कंत्राटदार M/s SMC Infrastructures Pvt. Ltd. Thane यांची प्राप्त निविदा प्राकलनीय राशीवर 60.94 टक्के नी जास्त असून एकूण रू. 11,83,62,720/— ची आहे. या रक्कमेला मा. आयुक्तांनी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय तांत्रिक समितीने सुध्दा मान्यता दिली आहे. तरी समितीच्या अहवालानुसार M/s SMC Infrastructures Pvt. Ltd. Thane यांची रू. 11,83,62,720/— च्या निविदेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 132</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर